ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

# आधुनिक आणि आधुनिकोत्तरवाद

डॉ. संगीता श्रीकांत पांडे

आदर्श महाविद्यालय, बदलापूर

समाज हा गतीशील असतो, समाजात सातत्याने परिवर्तन बदल घडत असतात. आज जी गोष्ट आधुनिक वाटते ती कालांतराने परंपरा बनते, जुनी होते. आज जे नवीन आहे, आधुनिक आहे, त्यात पुनः नवनवीन बदल होत जातात, आधुनिकतेच्याही पूढे जाणारे म्हणजे उत्तर आधुनिकता किंवा आधुनिकोत्तरवाद किंवा Post modernism Post modern किंवा आधुनिकोत्तर याचा शब्दशः अर्थ आहे, Post म्हणजे नंतर आधुनिक किंवा सांप्रतच्या नंतर किंवा अगदी आताच्या नंतर डॉ. बी. आर. जोशी लिहीतात कि, " आधुनिक तत्वज्ञानाच्या स्वरूपात व रचनेत अमुलाग्र बदल करण्याचे जे विचार प्रवाह विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाले तेथून आधुनिकोत्तर ही संकल्पना (पूढे आली) अगर संज्ञा पूढे आली" ? आधुनिक विचारविश्वात झालेले बदल म्हणजे आधुनिकोत्तरवाद.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

काही विचारवंत सांगतात कि आधुनिक संपले आहे आणि आता काहीतरी वेगळ्या नव्या पर्वाला सुरूवात झाली आहे. पूर्व आधूनिक काळ आणि आधुनिक काळातील रचनेत बदल करण्याचे कार्य त्यांनी केले आहे. मीशेल फूको, जॅक डेरीडा, जीन - फ्रँकॉईस ल्योटार्ड, गिल्स डेलेयुझ, फेलीक्स ग्वाटरी हे आधुनिकोत्तर तत्वज्ञानाचे विचारवंत मानले जातात त्यांनी आधुनिकोत्तर विचारप्रवाहाला एक दिशा दिली आधुनिकोत्तर विचारविश्वाचा एक वैशिष्ट्यपूर्ण सूर ठरविला आधुनिकोत्तर विचार वंताना तात्कालीक समाजाच्या आगळे-वेगळे पणाची जाणीव आहे. आधुनिकोत्तर परिस्थितीविषयी त्यांना माहिती आहे. संपूर्ण जगाकडे पाहण्याचा त्यांचा एक विशिष्ट दृष्टीकोन आहे. आधुनिकोत्तरवादाकडे संशयवादाचा एक प्रकार म्हणूनही पाहिले जाते. आधुनिक तत्वज्ञानाच्या इतिहासातील संकल्पनांवर ते संशय घेतात. अधिसत्ता (Authority) प्राप्त प्रज्ञान, बुध्दीचे वर्चस्व या सर्वावर ते संशय घेतात. श्री, व्दं. बोकील लिहितात, " आधुनिकोत्तर समीक्षान्तर्गत विचार हा बुध्दीच्या वर्चस्वाविरूध्दची प्रतिक्रिया आहे तत्वज्ञानाच्या क्षेत्रात ज्याला बौध्दिक व्यवस्थाकरण (System Building in Philosophy) असे म्हणता येईल, त्याविरूध्दचे हे सर्व बंड आहे" 2 आधुनिकोत्तरता किंवा भांडवलशाही नंतरच्या सांस्कृतीक परिसिथतीचे विश्लेषण करण्यासाठी तात्वीक संकल्पनांचा वापर करताना ते दिसतात.

आधुनिकोत्तरवादी तत्वज्ञान हे एक असा एकत्रित (united) सिध्दांत नाही , वेगवेगळया विचारवंतांनी हया विचार सरणीमध्ये भर घातली आहे. बरेचदा ते मार्क्सचे अनुकरण करतात किंवा मार्क्सवादाशी साम्य दर्शवतात. जॅक डेरीडा लिहतात , " Deconstruction never had meaning or interest, atleast in my eyes, than as a radicalization, that is to say also within the tradition of certain marxism in certain spirit of marxism" मिशेल फूको पण त्यांचे विश्लेषण मार्क्सवादी संकल्पनांमधे करताना दिसतो, त्यांच्या मते सर्व वर्ग संघर्ष आणि वर्गसंघर्षाचे मानवी संबंधावर आणी संस्थावर झालेले परिणाम हे राजकीय आहेत.

## II

आधुनिक तत्वज्ञानी त्यांच्या पूर्वीच्या म्हणजे पूर्व आधुनिक काळातील तत्वज्ञांनावर टिका केली, त्यावर आक्षेप घेतले, पूर्व आधुनिक काळात

परंपरा, श्रध्दा, (Super Natural) अतिनैसर्गिक शक्ती यांना आत्यंतीक महत्व दिलेले दिसून येते, तर आधुनिक तत्वज्ञानाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे बुध्दी आणि अनुभवाला दिलेले महत्व. निसर्ग विश्वाला जाणण्यासाठी बुध्दी आणि प्रत्यक्ष अनुभवाची महत्वपूर्ण भूमिका आहे असे मानतात. आधुनिक विचारवंत मानवाच्या स्वायत्ततेवर भर देतात. मानव त्याच्या जडणघडणीत स्वतंत्र आहे, ते व्यक्तीला (Individual) महत्व देतात. व्यक्तीवाद हे आधुनिक काळाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. बुध्दी आणि व्यक्तीवादाला दिलेल्या महत्वाची परिणती विज्ञानाच्या विकासात झालेली दिसून येते. आधुनिक जगात सातत्याने बुध्दी, स्वातंत्र्य आणि प्रगतीविषयी बोलले जाते परंतु याचे अनेक दुष्परीणामही समाजावर झालेले दिसून येत आहे, आधुनिकेत्तरवादी त्यावर भाष्य करतात आधुनिकोत्तरवादी विचारवंत तात्वीक संकल्पनांवरच आघात करतात आणि बुध्दी, सत्य वस्तुनिष्ठ ज्ञान ते नाकारतात.

आधुनिकेत्तरवादाचे वैशिष्ट्य हे आधुनिक तत्वज्ञानातील संकल्पना नाकारणे, त्यांच्या विरोधी ते आहे. आधुनिकता वास्तववाद (Realism) स्विकारते तर आधुनिकोत्तरवाद हा वास्तववादाच्या विरोधात (Anti-Relism) आहे. अनुभव आणि बुध्दीच्या ऐवजी आधुनिकोत्तरवादी भर देतात ते भाषिक सामाजिक व्यक्तीनिष्ठतेला (Linguist Social Subjectivism). स्वायत्ता आणि व्यक्तीची तादात्म्यता या ऐवजी वंश, लिंग आणि वर्ग गट यांना महत्व देतात. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती मानवी हित किंवा यशापेक्षा आधुनिकोत्तरवाद त्याव्दारे होणाऱ्या शोषणाकडे आणि दडपशाही कडे वर्ग संधर्षाकडे लक्ष नेतो . आधुनिक तत्वज्ञानाच्या इतिहासातील सव्दसुमीमांसा, ज्ञानमीमांसा, मानवी स्वभाव इ. प्रांतातील संकल्पना आधुनिकोत्तर तत्वज्ञ मान्य करीत नाही, त्याची चर्चा प्रस्तुत निबंधात केली आहे. याशिवाय या संकल्पनांची प्रतिक्रीया देत असताना आधुनिकोत्तर तत्वज्ञानी भाषा, तीचे व्यकरण, भाषेचे अर्थ विवरण याकडेही लक्ष वेधले आहे. त्यावरही प्रस्तुत निबंधात भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

**III**

आधुनिक पाश्चात्य परंपरा असे मानते कि मानवी मनाहून वेगळे वास्तव अस्तित्वात आहे, जे पूर्णपणे मनाच्या निरपेक्ष आहे. हे वस्तुनिष्ठ वास्तव जग मानवी मनापासून पुर्णपणे स्वतंत्र आहे. आधुनिकोत्तर तत्वज्ञ सार्वत्रिक वास्तवता, निश्चित ठरलेली वास्तवता (Fix Reality) नाकारतात, त्यांचा सदवस्तूमीमांसे बाबताचा दृष्टीकोन Anti Realist आहे. कारण त्यांच्या मते स्वतंत्र अस्तित्वात असणाऱ्या वास्तवाबद्दल अर्थपूर्ण बोलणे अशक्य आहे. आधुनिकोत्तर विचरवंतांच्यामते (Reality) वास्तवता असे काही नाहीच, ज्याला आपण वास्तवता मूहणतो ते केवळ शब्द आहेत, Conceptual Construct आहेत ही केवळ भाषिक सामाजिक रचना (Linguistic Social Construct) आहे शब्द हे त्यांच्या विशिष्ट प्रणालींशी संबंधीत असतात, ज्यात हे प्रत्यक्ष सहभागी होतात, जे जे शब्द आपणांपर्यंत पोहोचू इच्छितात आपण वास्तवा बद्दल केवळ तेच जाणू शकतो. डेरीडाच्या संशयवादानुसार तत्वज्ञान, विज्ञान किंवा कांदबरीमध्ये वास्तवाचे वर्णन अचूकपणे केले जाते ते आक्षेपार्ह आहे, आधुनिकोत्तर विचारवंत ऐतिहासिक वृतांत विवेचनाची सत्यता ही नाकारतात. भाषेचे स्वरूप हे न समजल्यामुळे काही साहित्यीक हे काही ग्रथांना 'Classic Realist text' म्हणतात ते डेरीडाच्या मतानुसार पूर्णपणे चूकीचे आहे. भाषेचे स्वरूप न समजल्यामुळे त्यांचा हा असा चूकिचा विश्वास आढळतो.

**II (2)**

आधुनिकोत्तरवादी स्वतंत्र वास्तवता (Independent Reality) नाकारतात, त्याच प्रमाणे वास्तवाचे वस्तुनिष्ठ ज्ञान प्राप्त करण्यासाठी बुध्दी किंवा दुसऱ्या कोणत्याही पध्दतीलाही ते नाकारतात. वास्तवतेऐवजी भाषीक सामाजिक Constructs चा पर्याय ते सूचवतात, ते व्यतीनिष्ठतेवर भर देतात. त्यांच्या मतानुसार तात्वीक दृष्टीकोनातून जगाविषयीचा वास्तुनिष्ठ दृष्टीकोन शक्यच नाही, आधुनिकोत्तरवादानुसार विश्व, समाजिक प्रणाली (Social Systems) किंवा व्यक्तीची तादात्म्यता (Identity) हे सर्व दिलेले नाही तर ते सर्व भाषेत रचले गेले आहे. डेरीडाच्या शब्दात "There is nothing outside the text", ह्या सर्वामुळे एका दिलेल्या प्रणालीशी प्रामाणिक शहण्याचा विश्वास तुटू शकतो आणि त्यामुळे आपण ज्या पध्दतीने जगाकडे

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

पाहतो किंवा पहायला हवे ते बदलू शकते.

आधुकिन तत्वज्ञानातील संकल्पना कि विज्ञानातील किंवा इतिहासातील वर्णनात्मक आणि स्पष्टीकरणात्मक (Explanatory) विधाने हि सत्य किंवा असत्य असतात आणि ती वस्तुनिष्ठ असतात' हे अधुनिकोत्तरवादी मान्य करत नाही. त्यांच्या मते वस्तुनिष्ठ सत्य असे काहीच नसतेच.

आधुनिक विचारवंताच्या मते तर्कशास्त्र आणि बुध्दीचे नियम सार्वत्रिक (Universally) valid आहे आणि ते सर्वच क्षेत्रात सारखे आहेत, याला आधुनिकोत्तरवादी आक्षेप घेतात, त्यांच्या मतानुसार बुध्दी आणि तर्कशास्त्राचे नियम हे Conceptual Construct आहेत आणि ते ज्या क्षेत्रात वापरले जातात ते केवळ त्या क्षेत्रासाठीच लागू पडतात.

मिशेल फुको म्हणतो की त्याचे सर्व विश्लेषण हे मानवी अस्तित्वाची सार्वत्रिक अनिवार्यतेच्या विरोधात आहे. " All my analysis are against the idea of universal necessities in human existence". ही जी अनिवार्यता आहे त्याला आपण भूतकाळातील बॅगेज म्हणून बाजूला सारायला हवे. त्याच्या मते बुध्दी (Reason), सत्य किंवा ज्ञान यांच्याविषयी किंवा त्यांच्या विरोधात बोलणे हे अर्थहीन आहे. पाश्चात्य आधुनिक विचार किंवा मानव हा वास्तवतेचे ज्ञान घेऊ शकतो आणि ते ज्ञान काही पुरावे किंवा अंतर्ज्ञानाव्दारे पडताळून पाहू शकतो किंवा त्यांचे समर्थन करू शकतो हे आधुनिकोत्तरवादींना मान्य नाही. आधुनिकोत्तर विचरवंतांच्या मते आपल्या विचारांना किंवा भावनांना मार्गदर्शक करणारे असे काही नसतेच मिशेल फूको लिहतात "Reason is the ultimate language of madness".

**III (3)**

आधुनिकोत्तरवादीच्या मते मानवी स्वभाव किंवा (मानवी Psychology) मानसशास्त्र हे पूर्णपणे समाजाने निश्चित किंवा निर्धारीत केलेले असते, ते समाजात राहत असतांना सामाजिक संबंधामुळे घडत असते आणि जन्माच्या क्षणी कोणत्याही क्षमता किंवा कौशल्ये मानवाला प्राप्त होत नाही तर तो या सर्व हळू हळू शिकतो, सामाजिक शक्ती त्याला तशाप्रकारे घडवतात एखादी व्यक्ती ज्या भाषीक सामाजिक गटात राहते ते त्याची ओळख निश्चीत करतात, आणि ती व्यक्ती त्या गटाचाच एक भाग बनते. हे गट वांशीकदृष्ट्या, लिंगाच्या , संपत्तीच्या संदर्भात भिन्न असतात. या गटांमधील संघर्षाच्या संबंधावरही आधुनिकोत्तर विचारवंत सपष्टीकरण देतात हे संघर्ष सोडवीण्यासाठी मुख्यात्वे शक्तीचा वापर केला जातो. ह्या शक्ति त्या गटांतील संबंधाना दडपशाही, वर्चस्व किंवा शरणागती कडे नेते, संघर्षामध्ये जे गट दडपले जातात, ज्यांच्यावर अन्याय होतो अश्या गटांकडे आधुनिकोत्तरवादी सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवतात, त्यांच्यावतीने अन्यायाचा प्रतिकार करण्यास ते तयार असतात.

भांडवलशाही राष्ट्रांत स्त्रियांवरील, गरीबांवरील किंवा वांशीक अल्पसंख्यांकावर होणाऱ्या अन्यायावर पडदा टाकला जातो, या अन्यायावर पडदा टाकण्यासाठी भांडवलशाही संस्कृती स्वातंत्र्य आणि समानता, लोकशाही आणि प्रगती यावर बोलते फूको च्या मते तुरूंगांकडे पाहिल्यावर आपणांस सत्तेचे प्रकटीकरण दिसून येते या ठिकाणी सत्ता ही छुप्या किंवा मुखवटाच्या स्वरूपात दिसत नाही.

**IV (4)**

आधुनिकोत्तर तत्वांच्या मते विश्व, सामाजीक संबंध / प्रणाली हे सर्व भाषेतच रचले गेले आहे. त्यांचा विरचना (Reconstruction) हा रचनावाद्यांनी तयार केलेल्या बौध्दीक व्यवस्था अगर प्रणाली विरूध्दचे बंड मानले जाते -विरचनावाद्यासाठी भाषेचा आणि वास्तवाचा संबंध दिलेला नसतो, किंवा तो विश्वासार्ह नसतो. सर्व भाषेच्या प्रणाली ह्या मूलतः विश्वासार्ह नसतात, त्या संस्कृतीचा परिपाक असतात. डेरीडाच्या मतानुसार आतापर्यंतच्या पश्चात्य परंपरेत हेच मानले गेले की भाषा आणि विश्व यांतील संबंध पूर्णपणे निश्चीत आणि विश्वासार्ह स्वरूपाचा व्यवस्थित एकमेकांवर आधारित आहे. भाषा ही वास्तवाची प्रतिमा (mirros image) मानण्यात आली, पण आधुनिकोत्तरवादींना हे मान्य नाही . भाषा ही अर्थासंबंधी self referential आहे. एखाद्या शब्दाचा अर्थ हा स्थीर नसतो किंवा ती मनातील काही संकल्पना नसते, तर त्यांचे कार्यक्षेत्र किंवा पल्ला हा अनेक परस्पर विरोधी,

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

तफावत असणाऱ्या शब्दांचा अर्थ आणि त्यांच्याशी फरक असा आहे. शब्दाचा अर्थ हा दूसऱ्या अर्थाचे कार्य आहे जे पुन्हा दुसऱ्या अर्थाचे कार्य असते. भाषा व्यवहार (discourse) हा ना त्या गटापुरता किंवा समाजा पुरता असतो, जो त्या सामाजिक रिती रीवाजांशी जुडलेला असतो आणि त्या समाजाची जी नैतीक आणि बौध्दीक मूल्ये आहेत किंवा परंपरा आहेत त्यातून त्या शाब्दीक योजना प्रतीबींबीत होतात.

आधुनिकोत्तरवादींच्या मते कोणतेही text (पोथी) किंवा लिखीत वाङःमय याचा कोणी लेखक किंवा कर्ता नसतो, त्याला डेरीडाच्या शब्दात master signifier नसतो, कोणत्याही लिखीत वाङःमयासाठी त्या वाचकाने किंवा ऐकणाऱ्याने लेखकावर विसंबून न रहाता त्याने स्वतंत्रपणे त्याचे स्पष्टीकरण किंवा अर्थविवरण करावे. बार्थस आणि फूको ने याला ‘ The death of other’ असे म्हटले आहे. अर्थ विवरण करणारा त्याच्या कल्पना विश्वाचा वापर करून त्याला हवा तसा अर्थ तो देऊ शकतो. रूपकात्मक भाषा (metaphor) जेंव्हा वापरली जाते तेंव्हा त्या विषयाच्या स्पष्टीकरणासाठी ती असफल ठरते. विरचना दृष्टीकोन हा भाषेतील विरोधाभास दाखवून देतो आणि अर्थ सर्व ठिकाणी सर्व काळी अस्थीर असतो हे दाखवून देते .

**V (5)**

आधुनिकोत्तर त्तवज्ञ हे सत्य, बुध्दी आणि वास्तवता यांची विरचना करतात, त्यांच्या मते बुध्दी, सत्य आणि वास्तवता ह्यांनी पाश्चात्य संस्कृतीला आधिकारशाही, पिळवणूक, दडपशाही कडे नेले. जीन फ्रँकाईस ल्योटार्डच्या मते बुध्दी आणि सत्ता एकच आहेत, हे दोन्ही शब्द तुरूंग, मज्जाव, मनाई, निवडप्रक्रिया आणि सामाजिक हित याकडे नेणारे आणि त्या शब्दांशी समानार्थी आहेत. आधुनिक पाश्चात्य परंपरेत असे मानले जात होते कि तर्कशास्त्र आणि बुध्दीच्या जोरावर मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध उपकरणे शोधून काढली आणि त्यामुळे मानवाची प्रगती होत आहे. आधुनिक तत्वज्ञ असेही मानत होते की मानवी भविष्य हे उज्वल असेल, समाज समृध्द, ज्ञानी असेल आणि अशा समाजात मानवता (माणुसकी), न्याय, या सारख्या मूल्याचे प्रकटीकरण असेल या सर्व विचारांना आधुनिकोत्तरवाद छेद देतात. आधुनिकोत्तर विचारवंत असे मानतात की वैज्ञानीक आणि तांत्रीक ज्ञानाचा चुकीचा वापर करून तंत्रज्ञान हे विध्वंसक कार्यासाठी वापरले जात आहे. उदा. आण्वीक तंत्रज्ञान, तसेच लोकांवर अन्याय करण्यासाठी वापरले जात आहे.

आधुनिकोत्तरवाद बुध्दी आणि सत्ता यांच्या विरोधांसाठीची चळवळ किंवा एक प्रकारचे बंड पुकारते सामाजिक बदलासाठी ते प्रयत्न करतात. Frank Lentrichia च्या शब्दात, “Post modernism seeks not to find the foundations of truth but to exercise power for social change”.

**References:**

१) डॉ. बी. आर. जोशी – सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश – तत्वज्ञान कॉन्टीनेन्टल प्रकाशन, 2007 (पृ. 393-396)

२) श्री. व्यं. बोकील – मिशेल फुको यांचे भाषेवरील भाष्य – परामर्श खंड 25 अंक 1 मे - जून- जुलै 2003 पुणे विद्यापीठ तत्वज्ञान विभागाचं प्रकाशन – (पृष्ठ 41 - 48).

३) Quotation taken from Stephen R. C. Hicks Explaining a Post Modernism – Skepticism & Socialism from Rousseau to Foucault – Scholarly Publication, Wiscomsin , U.S.A. 2004. Page 5

४) I.B.I.D - Page 3

५) Christopher Butler – Post Modernism, A Very short Introduction, Oxford University Press -2002.

६) 'Post Modernism' from Encyclopedia of Britannica https://www.britanicca.com/topic/post-modernismphilosophy - written by Brain Dulgnan.

७) Garry Aylesworth – Post – Modernism – from Standford Encyclopedia of Philosophy – Plato. Standard edu/entries / postmodernism

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

Original Research Article

८) www.iep.utm.edu/derrida (Jacqus Derrida)

**Cite This Article:**

* डॉ. संगीता श्रीकांत पांडे,, *(2022).* आधुनिक आणि आधुनिकोत्तरवाद, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (IV) July – August,*** *111-115.*